महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वाी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मार्स/रवका/न.क्र.२-ब/६२९३
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : २१/०३/२०१७

# परिपत्रक

विषय : महावितरण कंपनीमधील महिला कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या प्रसुति रजेसंदर्भात स्पष्टीकरण निर्गमित करण्याबाबत.

संदर्भ :१) प्रशासकीय परिपत्रक क्र.२५२ दिनांक ०१.१०.२००९.
२) वित्त विभाग, महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र.अरजा-१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा ०६ दि.२४.०८.२००९
३) महाराष्ट्र शासन यांचे पत्र क्र.संकिर्ण-२०१६/२४०७/प्र.क्र.६०५/ऊर्जा-२ दिनांक २७.१२.२०१६.

........

म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम २००५ मधील प्रकरण पाच (०५) अंतर्गत कंपनीतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अनुज्ञेय असलेल्या रजेबाबत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. याच तरतुदीअंतर्गत सेवाविनियम क्र.५३ अन्वये कंपनीमध्ये कार्यरत महिला अधिकारी/कर्मचारी यांना प्रसुति रजेच्या प्रारंभापासून ९० दिवस सरासरी वेतनातील रजा मंजूर करण्यात येत होती. तद्नंतर सदर रजेचा कालावधी महाराष्ट्र शासन निर्णय क्र.अरजा-१४०९/प्र.क्र.८/०९/सेवा ०६ दि.२४.०८.२००९ च्या धर्तीवर १८० दिवसांपर्यंत प्रशासकीय परिपत्रक क्र.२५२ दि.०१.१०.२००९ अन्वये वाढविण्यात आला असून सेवाविनियम क्र.५३ (क) (दोन) व ५३ (ख) मध्ये त्याअनुषंगाने सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

२. उपरोक्तपणे वाढीव प्रसुति रजेचा लाभ ज्या महिला कर्मचाऱ्यांची प्रसुति रजा ही याबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या तारखेपुर्वी सुरू झाली आहे व सदर आदेश लागू झाल्यानंतर समाप्त होत आहे अशा महिला कर्मचाऱ्यांना देण्याबाबतच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासन स्तरावर सदर प्रकरणी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीसंदर्भात विचारणा करण्यात आली होती.

३. या अनुषंगाने आता अवर सचिव, उद्योग,ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१६/२४०७/प्र.क्र.६०५/ऊर्जा-२ दि.२७.१२.२०१६ अन्वये या संदर्भात मार्गदर्शन प्राप्त झाले असून ज्या राज्य शासकीय महिला कर्मचाऱ्याची रजा हया शासन निर्णयाच्या दिनांकास चालू असेल, अशा महिला कर्मचाऱ्यास वाढीव रजेचा लाभ अनुज्ञेय आहे असे नमूद केले आहे.

४. सदर मार्गदर्शन विचारात घेऊन स्पष्ट करण्यात येते की, महावितरण कंपनीतील महिला कर्मचाऱ्यांना वाढीव प्रसुति रजेच्या कालावधीचा लाभ हा शासनाने या संदर्भात लागू केलेल्या तरतुदींच्या धर्तीवर देय करण्यात आला असल्याने कंपनीतील ज्या महिला कर्मचाऱ्यांच्या प्रसुति रजा प्रशासकीय परिपत्रक क्र.२५२ दि.०१.१०.२००९ निर्गमित झालेल्या तारखेस चालू होत्या अशा महिला कर्मचाऱ्यांना वाढीव रजेचा लाभ अनुज्ञेय राहील.

५. या अनुषंगाने सर्व सक्षम अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरील परिच्छेद क्र.४ मध्ये नमूद केल्यानुसार ज्या महिला कर्मचाऱ्यांच्या प्रसुति रजा प्रशासकीय परिपत्रक क्र.२५२ दि.०१.१०.२००९ निर्गमित झालेल्या तारखेस चालू होत्या अशा महिला कर्मचाऱ्यांची प्रसुति रजा ही १८० दिवसांच्या मर्यादेपर्यंत गणण्यात येऊन त्यांचे खाती प्रसुति रजेपोटी गणण्यात आलेली इतर रजा म्हणजेच अर्जित रजा, अर्धसरासरी वेतनावरील रजा त्यांच्या रजेच्या खात्यामध्ये वळत्या/जमा करून पुर्नपरिगणीत करण्यात याव्यात.

६. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

सोबत : वरील प्रमाणे.

२१९/२०१३

( संदेश हाके )
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Circular F.N.2-B - Maternity Leave.doc*
*18/03/2017*